

नौदलाच्या दोन महिला अधिकाऱ्यांची सागर परिक्रमेला सुरुवात पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



कसोटी क्रमवारीत बुमराह अव्वल पान ८ वर

वेर्णा, गुरुवार, ३ ऑक्टोबर २०२४ | पाने ८ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 30 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 3 October, 2024 | Pages 8 | ₹ 4

**संपादकीय**

मध्यपूर्वेत परिस्थिती गंभीर –पान ४

**निवडक**

### इराण-इस्रायल संघर्ष चिघळणार?

**जेरुसेलम, दि. २ :** इस्रायल आणि इराणमध्ये आता संघर्ष पेटला असून मंगळवारी (१ ऑक्टोबर) रात्री इराणने इस्रायलची राजधानी तेल अविववर हल्ला केला आहे. या हल्ल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेत्यानाहू यांनी देखील इराणला मोठा इशारा दिला आहे. इराणने आमच्यावर क्षेपणास्त्र डागून गंभीर चूक केली आहे. त्यामुळे आता होणाऱ्या परिणामांना सामोरं जावं लागेल, असा इशारा इस्रायलने दिला आहे. त्यामुळे इस्रायल आणि इराणमध्ये आता संघर्ष पेटण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आता भारताने इराणमध्ये राहणाऱ्यांनी भारतीयांसाठी ॲडव्हायजरी जारी केली आहे.

### विनेश फोगाटच्या प्रचारासाठी प्रियंका गांधी मैदानात

**नवी दिल्ली, दि. २ :** हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रियांका वाड्रा–गांधी यांनी बुधवारी(२ ऑक्टोबर) हरियाणामध्ये पक्षाचा प्रचार केला. यावेळी त्यांनी ५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत भाजपला सत्तेतून हद्दपार करण्याचे आवाहन केले. प्रियंका त्यांच्या पक्षाच्या उमेदवार आणि ऑलिम्पिक कुस्तीपटू विनेश फोगट यांच्या प्रचारासाठी जुलाना येथे आल्या होत्या. यावेळी त्यांनी रोजगार, अग्निवीर, शेतकरी कल्याण या मुद्द्यांवरुन राज्य आणि केंद्र सरकारवर निशाणा साधला. सत्ताधाऱ्यांनी प्रत्येक स्तरावर जनतेचा विश्वासघात केल्याचा आरोप त्यांनी केला. प्रियांका गांधी आपल्या भाषणात म्हणाल्या की, कुरुक्षेत्राची लढाई आणि ब्रिटीश राजवटीविरुद्धच्या लढाईसारखी संधी पुन्हा आली आहे. आजचा लढा अन्याय, असत्य आणि वाईटाच्या विरोधात आहे. तुम्हाला हा लढा लढावाच लागेल. हे सरकार मूठभर उद्योगपतींच्या फायद्यासाठी काम करत आहे. केंद्र सरकार रोजगार निर्मिती करू शकत नाही, कारण या सरकारने अंबानी–अदानींना सर्व काही दिले आहे.

### झारखंडमध्ये रेल्वे ट्रॅकला बॉम्बने उडवले

**नवी दिल्ली, दि. २ :** गेल्या काही दिवसांपासून रेल्वेचा अपघात घडवण्यासाठी रुळांवर दगड, सिलेंडर आणि लोखंडी खांब ठेवल्याच्या घटना घडल्या आहेत. पण, आता झारखंडमधून यापेक्षाही धक्कादायक घटना घडली आहे. साहिबगंजमध्ये स्फोटकांनी चक्क रेल्वे ट्रॅकच उडवण्यात आला. लालमाटिया ते फरक्का, या एमजीआर रेल्वे मार्गावर ही घटना घडली. या भीषण स्फोटाने परिसर हादरुन गेला. रेल्वेकडून मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (२ ऑक्टोबर) साहिबगंज जिल्ह्यातील बरहेत पोलीस स्टेशन हद्दीतील रंगा घुड्डू गावाजवळ लालमटिया ते फरक्का हा एमसीआर रेल्वे मार्ग स्फोटकांनी उडवण्यात आला. हा स्फोट इतका धोकादायक होता की, स्फोटानंतर रुळावर तीन फूट खोल खड्डा पडला. रेल्वे ट्रॅकपासून सुमारे ३९ मीटर अंतरावर ट्रॅकचे तुकडे सापडले. तर, अधिकाऱ्यांना घटनास्थळावरुन स्फोटकांचे सामानही सापडले आहे.

**हवामान**

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

**बाजार भाव**

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

**शेअर मार्केट**

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७↑ (२३१.१६ )

निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# संतप्त जमावाचा पोलिस ठाण्यात ठिय्या!

**मुख्याध्यापिका आणि वर्गशिक्षकांना अटक करण्याची मागणी | तिसरीतील विद्यार्थिनीची प्रकृती अद्याप चिंताजनक**

■ टीम दैनिक हेराल्ड

**कुंकळ्ळी, दि. २ : सेंट अँथनी प्राथमिक शाळा, वेरोडा येथील मुख्याध्यापिका आणि वर्गशिक्षकांना तातडीने अटक करण्याची मागणी करण्यासाठी कुंकळ्ळी पोलिस ठाण्यात बुधवारी मोठा जमाव जमला. संतप्त जमावाने आरोप केला की, शाळेच्या व्यवस्थापन व शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे सेंट अँथनी प्राथमिक शाळेतील एका नऊ वर्षांच्या विद्यार्थिनीचा जीव धोक्यात आहे.जर शाळेच्या मुख्याध्यापिका आणि शिक्षकांना अटक झाली नाही, तर जमावाने पोलीस ठाण्यात धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.**



आठवडाभरापूर्वी, तिसरीत शिकणारी स्वरा फातर्पेकरचे वर्गातील विद्यार्थ्यांसोबत भांडण झाले. या विद्यार्थ्याने केलेल्या मारहाणीत स्वरा गंभीर जखमी झाली. सध्या तिला गोवा मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले आहे.या संदर्भात, मुलीच्या वडिलांनी घटनेच्या दिवशीच कुंकळ्ळी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.

आठवड्यानंतरही पोलिसांनी शिक्षकांविरुद्ध एफआयआर दाखल केला नाही. सुमारे ३०० लोकांच्या जमावाने पोलिसांना घेरले आणि शाळेविरुद्ध पोलिसांनी आणि शिक्षण विभागाने योग्य कारवाई करावी अशी मागणी केली.जमावाचा आरोप आहे की, शाळेच्या व्यवस्थापनाने घटना दडपण्याचा प्रयत्न केला आणि पोलिसांवर दबाव आणून घटनेची नोंद केली नाही.

विद्यार्थिनी बेशुद्ध झाल्यानंतरही शाळा प्रशासनाने तातडीने योग्य दखल घेतली नाही असा मुलीच्या कुटुंबियांचा आरोप आहे. मुलीच्या आईने नातेवाईकांना बोलावून त्यांच्या मदतीने मुलीला रुग्णालयात नेले. शाळेचे कर्तव्य होते की त्यांनी १०८ रुग्णवाहिका बोलावून जखमी विद्यार्थिनीला रुग्णालयात नेले पाहिजे होते. व्यवस्थापन आणि शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे मुलीची प्रकृती अधिकच बिघडली. उशीर झाल्याने मुलीच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचा आरोप पालकांनी केला.स्थानिक लोकांचा आरोप आहे की, शाळेचे व्यवस्थापन पोलिसांच्या मदतीने पुरावे नष्ट करण्याचा आणि पालक तसेच पालक– शिक्षक संघाच्या सदस्यांना धमकावून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करत आहेत. मुख्याध्यापकांनी खोट्या सह्या मिळवल्याचा आरोप आहे. शाळेच्या व्यवस्थापनाने पोलिसांना सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध करून दिले नाही. अखेर हे प्रकरण गुन्हे शाखेकडे सुपूर्द करण्यात आले.पोलीस अधीक्षक संतोष देसाई आणि इतर अधिकाऱ्यांनी जमावाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.महिलांना सूर्यास्तानंतर अटक करणे शक्य नसल्यामुळे उद्या सकाळी दोषी शिक्षकांना अटक करू, असे पोलिसांनी आश्वासन दिले.

# धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांना बाजूला काढा : काँग्रेस

■ टीम दैनिक हेराल्ड

**▶ काँग्रेसच्या सत्याग्रहात भ्रष्टाचाराविरोधात एल्गार**

**पणजी, दि. २ :** गांधीजयंती दिवशी काँग्रेसने बुधवारी गांधी सर्कल, जुने गोवे येथे शांततापूर्ण सत्याग्रह केला, ज्यात जातीय सलोख्याचे रक्षण आणि सरकारच्या जमीनविषयक धोरणांना विरोध करण्याचे आवाहन केले गेले.यावेळी बोलताना विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी भाजप सरकारवर गोवा विकण्याचा आणि जात आणि धर्माच्या आधारे फूट पाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. वर्तमान सरकारच्या काळात वाढलेला भ्रष्टाचार, बेकायदा जमीन परिवर्तन आणि वाढती बेरोजगारी उघड करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या प्रयत्नांना यावेळी आलेमाव यांनी अधोरेखीत केले.

भाजप जातीय आधारावर फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहे.गोव्यात, सर्व समुदाय एकोप्याने एकत्र राहतात आणि जातीय सलोखा हे नेहमीच आपल्या राज्याचे वेगळेपण राहिले आहे. मी लोकांना आवाहन करतो की, आपल्यात फूट पाडू पाहणाऱ्या घटकांना नाकारून आपली दीर्घकालीन एकता कायम ठेवावी असे यावेळी आलेमाव बोलताना म्हणाले.

जागतिक वारसा स्थळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुने गोवा परिसरातील जमिनींवर भाजपचा डोळा असल्याची टिकाही आलेमाव यांनी यावेळी केली. हे धक्कादायक आहे की जुन्या गोव्याचा वारसा दर्जा असूनही, भाजप सरकार ते 'शर्मा' आणि 'वर्मा' यांना विकू पाहत आहे, असा आरोप त्यांनी केला. जुन्या गोव्यातील आयपीबी रिसॉर्ट प्रकल्पाला परवानगी देण्याच्या सरकारच्या प्रयत्नाचा त्यांनी निषेध केला, जो विरोधानांतर रद्द करण्यात आला.

त्यांनी असेही नमूद केले की भाजप आता जुन्या गोव्याजवळील एला येथे आणखी एका मोठ्या भुखंडाला लक्ष्य करत आहे. आलेमाव यांनी काँग्रेस ऐतिहासिक वास्तू नष्ट होऊ देणार नाही अशी शपथ घेतली आणि जुन्या गोव्यात बांधलेल्या बेकायदेशीर बंगल्यावर कारवाई करण्याची मागणी केली.

गोवा प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमित पाटकर यांनीही गोव्याच्या सांप्रदायिक सौहार्दाच्या परंपरेवर भर देत मेळाव्याला संबोधित केले. गोवावासीयांनी नेहमीच सर्व धर्मांचा आदर केला आहे आणि गोवावासीय नथुराम गोडसेच्या नव्हे तर महात्मा गांधींच्या विचारसरणीचे पालन करतात याचा मला अभिमान आहे, असे पाटकर म्हणाले.

गोव्यात जातीय अशांतता निर्माण करण्याच्या असामाजिक घटकांद्वारे अलीकडील प्रयत्नांबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आणि मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी काणकोण आणि कुंकळ्ळी येथील घटनांबद्दल मौन बाळगल्याबद्दल टीका केली. हे दुर्दैवी आहे की सत्ताधारी पक्षाच्या एका

पान २ ▶

# 'अशा' आमदारांच्या घरांवर दगडफेक व्हायला हवी : उदय भेम्ब्रे

टीम दैनिक हेराल्ड




**फातोर्डा, दि. २ :** संविधानाला साक्ष ठेवून घेतलेली शपथ मोडून आणि लोकांचा विश्वासघात करून ज्या आठ कॉन्ग्रेस आमदारांनी भाजप मध्ये सत्तेसाठी उड्या मारल्या, त्यांच्या घरांवर जर दुसऱ्या दिवशी दगड पडले असते तर खऱ्या अर्थाने गोव्यात लोकशाही राबते आहे हे दिसले असते असे विधान माजी आमदार आणि विचारवंत उदय भेंम्ब्रे यांनी गांधी जयंतीदिवशी केले आहे. 'सिटीझन्स फॉर डेमोक्रसी' या नागरिकांच्या एक गटाने फातोर्डा येथे आयोजित केलेल्या 'बापू आमचें गोंय वांचतले?' या चर्चासत्रात ते बोलत होते. आपल्या म्हणण्यातला हिंसक अर्थ बाजूला ठेवून जनतेचा झालेला विश्वासघात आणि त्यातून निर्माण होणारी भावना लक्षात घ्या असे त्यानी यावेळी सांगितले. या चर्चासत्रात ज्येष्ठ पर्यावरणवादी डॉ, क्लॉड अल्वारेस , माजी मंत्री सदानंद मळीक , इतिहासतज्ञ प्रजल साखरदांडे, एल्विस गोम्स हे वक्ते सहभागी झाले होते.

यावेळी बोलताना उदय भेंम्ब्रे म्हणाले की, गोव्यातला भुमीपुत्र आज नाहीसा होत चाललाय आणि परप्रांतीय वाढत चालले आहेत. परप्रांतीय भांडवलदारांनी आज गोव्याला विळखा घातलाय. हे होण्याचे कारण म्हणजे सरकारचे धोरण . आणि या सरकारला आपणच निवडून देतो. आणि सरकारमधले आम्ही निवडून दिलेले प्रतिनिधी चुकत असतील तर आम्ही नागरिक चुकतो आहोत असा त्याचा अर्थ होतो . आणि हेच गोव्याचे सर्वात मोठे दुखणे आहे. या दुखण्यातून कसे बाहेर यायचे ते कळायला मार्ग नाही. अलीकडे एका पक्षातल्या आठ आमदारांनी दुसऱ्या पक्षात माकडउड्या मारल्या. हे करताना त्यांनी घटनात्मक कायदा मोडला. याच लोकांनी या आधी संविधानचे आम्ही पालन करू अशी शपथ

पान २ ▶




# जमीन परिवर्तनाच्या निषेधार्थ नागरिक एकवटले

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** चिंचणी आणि गोव्याच्या इतर भागांतील शेकडो नागरिकांनी गोव्यासाठी नवीन प्रादेशिक आराखडयाची मागणी करीत सर्रासपणे जमिनीचे रूपांतरण आणि पर्यावरणाच्या नाशाच्या निषेधार्थ एक विशाल रॅली काढली. आंदोलकांनी नगरनियोजन कायद्यातील सततच्या दुरुस्त्या बंद करण्याचे आवाहन केले आणि मेगा प्रकल्पांच्या फायद्यासाठी निवडक बदल करता येणार नाहीत अशा दीर्घकालीन, स्थिर विकास योजनांच्या गरजेवर जोर दिला.

विकास योजनांना स्थानिकांची सहमती आणि सक्रिय सहभाग असायला हवा, हा या रॅलीचा महत्त्वाचा धागा होता. वेलीचे आपचे आमदार क्रुझ सिल्वा यांनी सांकवाळचे उदाहरण दिले. जेथे भुतानी मेगा प्रकल्पाला विरोध करण्यासाठी लोक रस्त्यावर उतरले आहेत. ते पुढे म्हणाले की इतर गावांमधील लोक देखील उठत आहेत पण त्यांना गृहीत धरले जात नाही.ज्येष्ठ पर्यावरणवादी कार्यकर्ते अभिजित प्रभुदेसाई यांनी चिंचणीच्या लोकांचे मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवल्याबद्दल कौतुक केले आणि असे सुचवले की अशा निषेधांमधून मेगा रिअल इस्टेट प्रकल्प आणि जमीन रूपांतरणाविरूद्ध हालचाली सुरू होऊ शकतात. २००६ च्या तसेच प्रादेशीक आराखडा २०११ च्या विरोधात झालेल्या जनआंदोलनाशी तुलना करून ही लोकचळवळ यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चिंचणी कोमुनिदादचे अध्यक्ष आग्नेल फुर्तादो यांनी गावातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पडीक जमिनीची लागवड कशी केली आहे याबद्दल विवेचन केले आणि गोव्याच्या जमिनींचे, विशेषत: कृषी क्षेत्रांचे संरक्षण करण्याचा हा एक मार्ग म्हणून अधोरेखित केला. इतर वक्त्यांनी लोटलीचा उल्लेख केला, जिथे प्रस्तावीत बोरी पुलामुळे खाजन शेती धोक्यात आली आहे.

रॅलीदरम्यान हे निदर्शनास आणून देण्यात आले की, सरकारकडे सिंचित कमांड एरिया यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांबद्दल अचूक डेटाचा

पान २ ▶

# जमीन रूपांतरण रद्द होईपर्यंत आंदोलन सुरूच

**'चोपडे गाव' बचाव आंदोलनाला प्रतिसाद : नागरिक समितीचा पाठिंबा**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २ :** आगरवाडा चोपडे नागरिक समितीने गांधी जयंती दिनी पुकारलेल्या चोपडे ग्राम बचाव आंदोलनाला गोवाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला स्थानिक नागरिकांची यावेळी लक्षणीय उपस्थिती होती. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर यांच्या सह प्रतिमा कुतिन्हो, तारा केरकर, स्वप्नेश शेर्लेकर, रामा काणकोणकर, किशोर नाईक गावकर, शंकर पोळजी राजन घाटे, मारवियन फेर्राव मेलवीन डिसोझा, सदानंद वायंगणकर, ॲड प्रसाद शहापूरकर, मांद्रे माजी सरपंच प्रशांत नाईक, उपसरपंच सौ तारा हडफडकर, देवेंद्र प्रभुदेसाई दयानंद मांद्रेकर, विवेक गावकर, अमोल राऊत, संजीव गांवकर,आल्बर्ट फर्णानडीस, संतोष मांद्रेकर, अमृत



**चोपडे : पाठिंबा दर्शविणारे नागरिक राजकीय नेते.**

पान २ ▶



# कवळेचे क्रीडांगण झाले दारूचा अड्डा

संतोष नाईक

■ टीम दैनिक हेराल्ड

**▶ मद्यपींवर कारवाई करण्याची मागणी**

**ग्रामस्थांनी राबवली स्वच्छता मोहीम**

फोंडा, दि. २ : दारूचा अड्डा झालेल्या कवळे मधील सार्वजनिक क्रीडांगणाची कवळे ग्रामस्थांनी गांधी जयंतीच्या निमित्ताने साफसफाई केली. यावेळी त्यांना क्रीडांगणावर फेकलेल्या शेकडो बीअर आणि दारूच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या. गेल्या काही दिवसांपासून या परिसरातील रहिवाशांना अत्यंत त्रासदायक झालेला हा प्रकार ताबडतोब बंद करावा आणि क्रीडांगणावर खुलेआम दारू प्यायला येणाऱ्या मद्यपींवर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

कवळेमधील सार्वजनिक क्रीडांगण हे दारूच्या पार्टीसाठी अनिष्ट हॉटस्पॉट बनले आहे, ज्यामुळे

पान २ ▶